**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

## पारंगत/आचार्य पदवी पूर्व (एमपेट) परीक्षा २०२१ आवेदनपत्र भरण्याकरीता मुदतवाढ
## विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

अमरावती-

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने सर्व संबंधित विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, पारंगत/आचार्य पदवी पूर्व (एमपेट) परीक्षा २०२१ चे आवेदनपत्र सादर करण्याकरिता दि. ०१ ते २५ सप्टेंबर, २०२१ ही तारीख निश्चित करण्यात आली होती. परंतू विद्यार्थ्यांनी केलेल्या मागणीनुसार व विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता विद्यापीठाच्यावतीने सदर आवेदनपत्र सादर करण्याकरिता दि. ०२ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी व आपले आवेदनपत्र विहित मुदतीत सादर करावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी विद्यापीठाच्यावतीने केले आहे. अधिक माहितीकरीता सहा.कुलसचिव सौ. मिनल मालधुरे यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्रमांक ९०११०९०४४७ यावर संपर्क साधता येईल.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २५/०९/२०२१.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी